( ईन कॅमेरा )

साक्षीदाराचे नांव कलम ७२ भारतीय न्याय संहिता, २०२३ (कलम २२८–अ भा.दं.वि.) अन्वये गोपनीय ठेवण्यात येते.

सरकारपक्षातर्फे सरतपासणी **साक्षीदार क्र.०२**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – **एस. आर. एस. एम. (पीडित मुलीचे वडिल),**

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील</u>**

०१) पीडित मुलगी (सा.क्र.१) माझी मुलगी आहे. घटनेच्या वेळी तिचे वय १५ वर्ष होते. ती नवव्या वर्गापर्यंत शिकलेली आहे. ती उर्दू माध्यमातून शिकत होती. ती वर्ग नऊ नंतर शाळेत जात नव्हती.

०२) आमच्या घराला लागून एका महिलेच्या घराचे बांधकाम सुरू होते. बांधकाम हे बांधकाम कारागीर करत होते.

०३) घटना ही दोन वर्षापूर्वीची रमजान महिन्यातील आहे. घटनेच्या दिवशी मी घरी होतो. घटनेच्या दिवशी रात्री ०८.०० वाजता मी झोपलो होतो. माझे घरी माझे आई–वडिल, पत्नी व मुले आहेत. घरातील लोकं माझे मुलीला शोधत होते व नंतर मला उठविले. मला घरातील लोकांनी सांगितले की मुलगी दिसत नाही, तिचा शोध घेणे आवश्यक आहे. मी शोध घेतला. माझी मुलगी रात्री १०.०० वाजता स्वत: घरी आली. माझे मुलीने सुरूवातीला काहीही सांगितले नाही. रात्री ११.०० ते १२.०० वाजता माझे मुलीने माझे पत्नीला घटनेबद्दल माहिती दिली. माझे पत्नीने काही वेळानंतर मला सांगितले. माझे पत्नीने सांगितले की मुलीसोबत कपडे काढून तिच्या शरीरासोबत जबरदस्ती केलेली आहे. त्या जबरदस्ती

करणाऱ्याचे नाव ठेंगे असे होते.

०४) दुसऱ्या दिवशी सकाळी ०७.०० वाजता माझे परिवारातील सदस्यांनी माझे मुलीला (सा.क्र.१) पोलीस स्टेशन व दवाखान्यामध्ये घेवून गेले.

०५) मोबाईल क्र.९६××××××१७ हा माझे वडिलांचा आहे. माझी मुलगी शर्ट व सलवार घालत होती. त्याचा रंग मला आठवत नाही. मला आता जप्त मुद्देमाल गुलाबी रंगाचा टॉप **(एमओ–१)** दाखविला, तो माझे मुलीचा आहे. मला आता जप्त मुद्देमाल प्लाझो पॅन्ट **(एमओ–२)** दाखविला, तो माझे मुलीचा आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए.ए. वैद्य, वकील**

०६) मी मजूरी काम जेथे मिळेल तेथे करतो. घटनेच्या ४ ते ५ महिन्यापूर्वी माझे मुलीने शाळेत जाणे बंद केले होते. आमच्या घरी माझे भाऊ सुध्दा सोबत राहतात. घरामध्ये एकूण सदस्यांची संख्या २० ते २२ लोकांची आहे. मला चार मुले आहेत. पीडित मुलगी (सा.क्र.१) सर्वात मोठी आहे. आम्ही पीडित मुलीचा २ ते ३ तास शोध घेतला होता. आम्ही आजुबाजूच्या रहिवाश्यांना पीडित मुलगी (सा.क्र.१) बाबत विचारले. मुलगी जेंव्हा घरी आली त्यावेळेस मी तिच्या शोध करण्याकरिता बाहेर होतो.

०७) मी स्वत:हून पोलीस स्टेशनला गेलो नाही. घटनेनंतर माझी व पोलीसांची भेट झाली नाही. साक्षीदार आता म्हणतो की पोलीस मला विचारण्याकरिता घरी आले होते. मी पोलीसांना सांगितले होते की माझे मुलीने माझे पत्नीला रात्री ११.०० ते १२.०० वाजता घटनेबद्दल माहिती

दिली होती. मी पोलीसांना सांगितले होते की माझे पत्नीने सांगितले की मुलीसोबत कपडे काढून तिच्या शरीरासोबत जबरदस्ती केलेली आहे. मी पोलीसांना माझे वडिलांचा मोबाईल क्र.९६××××××१७ हा आहे असे सांगितले होते. वरील तिन्ही बाबी माझे बयानामध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मला दाखविलेले कपडे मी पोलीसांना दिले नाही.

०८) हे म्हणणे खरे नाही की मी हे खोटे सांगत आहे की रात्री ११.०० ते १२.०० वाजता पीडित मुलीने माझे पत्नीला घटनेबद्दल माहिती दिली व माझे पत्नीने काही वेळाने मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की मी हे खोटे सांगत आहे की मुलीसोबत जबरदस्ती करणाऱ्याचे नाव ठेंगे असे होते. हे म्हणणे खरे नाही की मी कथन केलेला मोबाईल क्रमांक माझे वडिलांचा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ओळखलेले कपडे माझे मुलीचे नाहीत.

०९) हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी माझे, पीडित मुलीचे व पत्नीचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की आमच्या भांडणामुळे पीडित मुलगी (सा.क्र.१) घर सोडून गेली होती. हे म्हणणे खरे नाही की मी पीडित मुलीचे वय १५ वर्ष असल्याचे खोटे सांगत आहे.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरित/–

(आर.एम.सादराणी)

दिनांक – १०.०६.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.

*१०.०६.२०२६*
*विशेष न्यायाधीश, परभणी.*